| | |
|---|---|
| **MHAK110008062017** | दाखल दिनांक : १२.०६.२०१७<br>नोंदणी दिनांक : १२.०६.२०१७<br>निकाल दिनांक : ०८.०७.२०२६<br>कालावधी : ०९ वर्ष, ०० म., २६ दि. |

## भाग अ

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला.
## (पीठासीन अधिकारी एन. व्ही. साहू)

| | | |
|---|---|---|
| **नियमित फौजदारी खटला क्र.५७/२०१७** | | **निशाणी क्र. ६०** |
| पोलीस ठाणे हिवरखेड येथील गुन्हा क्र. ४५/२०१७ | | |
| सरकार पक्ष | : | **महाराष्ट्र सरकार तर्फे,**<br>पोलिस स्टेशन अधिकारी,<br>पोलिस ठाणे हिवरखेड,<br>ता. तेल्हारा, जि. अकोला. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | : | सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. सहारकर |
| | | **–विरुध्द–** |
| आरोपी | १.<br><br><br>२.<br><br><br>३. | **योगेश शहादेव कडु,**<br>वय २५ वर्ष, धंदा– मजुरी,<br><br>**संगिता शहादेव कडु,**<br>वय ४६ वर्ष, धंदा – मजुरी<br><br>**निकीता योगेश कडु,**<br>वय २२ वर्ष, धंदा – मजुरी,<br><br>सर्व रा. ग्राम चांगलवाडी, ता. तेल्हारा, जि. अकोला. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | : | श्री. व्ही. डब्ल्यू. जवंजाळ |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २०.०३.२०१७ |
| फिर्याद दाखल तारीख | २०.०३.२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २८.०३.२०१७ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २६.१२.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २०.०३.२०२३ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | ०८.०७.२०२६ |
| निकालाची तारीख | ०८.०७.२०२६ |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्ह्याखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौ. प्र. संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असतांना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | योगेश शहादेव कडु, | २१.०३.२०१७ | २१.०३.२०१७ | भा.दं.वि.चे कलम ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष | -- | -- |
| २. | संगिता शहादेव कडु | २१.०३.२०१७ | २१.०३.२०१७ | | निर्दोष | -- | -- |
| ३. | निकीता योगेश कडु, | २१.०३.२०१७ | २१.०३.२०१७ | | निर्दोष | -- | -- |

## भाग क

## सरकारी साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी.

### अ. सरकारी साक्षीदार:-

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.१ | राजेश सिताराम शेळके | फिर्यादी |
| सा.क्र.२ | दशरथ पुर्णाजी आमले | पंच साक्षीदार |
| सा.क्र.३ | भानुदास सुखदेव शेळके | साक्षीदार |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## अभियोग पक्ष/ आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| निशानी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| निशानी क्र. ३५/सा.क्र.१ | फिर्याद |
| निशानी क्र. ३६/सा.क्र.१ | छापील एफ.आय.आर. |
| निशानी क्र. ३८/सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशानी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशानी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| निरंक | |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

( दिनांक ०८.०७.२०२६ रोजी घोषित )

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की; –**

फिर्यादी राजेश सिताराम शेळके याने अशी तक्रार दाखल केली की, दि.२०.०३.२०१७ रोजी, सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास मौजा चांगलवाडी, ता. तेल्हारा जि. अकोला येथे तो त्याच्या घराजवळ उभा असतांना, आरोपी क्र.१ हा रस्त्यावर घरातील बोअरचे पाईपने पाणी सोडत होता. फिर्यादीने आरोपी क्र.१ यास पाणी सोडु नको म्हणून हटकले असता, त्याने फिर्यादीस म्हटले की, मी रस्त्यावर पाच फुट खड्डा खोदुन पाणी सोडेल तुझ्याच्याने जे होईल ते करुन घे असे म्हणून शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीस पकडून ठेवले आणि आरोपी क्र.१ ने फिर्यादीच्या अंगावरील कपडे फाडुन त्याला उजवे बरगडी खाली चावा घेतला. तसेच आरोपींनी फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली. तेव्हा तेथे उपस्थित भानुदास शेळके, दशरथ आमले, गोपाल रेडे यांनी त्यांचे भांडण सोडविले. अशा आशयाची फिर्यादीने पोलीस स्टेशन हिवरखेड येथे तक्रार दिली.

३. फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन, हिवरखेड येथे अपराध क्र. ४५/२०१७ नुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६

सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जवाब नोंदविले, आरोपींना अटक केली आणि तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे मा. पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२६.१२.२०२३ रोजी आरोपींविरुध्द नि.क्र. २४ वर भा.दं.वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप निश्चीत केले. त्यातील मजकुर आरोपींना त्यांच्या मातृभाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली.

५. खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | दि.२०.०३.२०१७ रोजी, ११.३० वाजताच्या दरम्यान मौजे चांगलवाडी, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे आरोपींनी संगनमत करुन त्यापैकी आरोपी क्र.२ व ३ यांनी फिर्यादीस पकडले व आरोपी क्र.१ याने फिर्यादीस तोंडाने चावा घेवून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली आणि अशाप्रकारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | **.. नकारार्थी.** |
| २. | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन उद्देशपूर्वक अपमान केला आणि अशाप्रकारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **.. नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| **३.** | वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला जिवानीशी मारण्याची धमकी दिली आणि अशाप्रकारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **.. नकारार्थी.** |
| **४.** | आदेश काय ? | **<u>आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.</u>** |

**:: <u>कारणमिमांसा</u> ::**

**६.** प्रस्तुत खटल्यात आरोपीं विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी राजेश सिताराम शेळके (सा. क्र. १) यांची साक्ष नि. क्र. ३४ वर, घटनास्थळ पंच साक्षीदार दशरथ पुर्णाजी आमले (सा. क्र. २) यांना नि. क्र. ३७ वर, साक्षीदार भानुदास सुखदेव शेळके (सा. क्र. ३) यांची साक्ष नि. क्र. ४३ वर नोंदविली. खटला चालवित असतांना आरोपीं विरुध्द गुन्हया संदर्भात विधाने आले असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपींची जबानी नि. क्र. ५५ ते ५७ वर नोंदविण्यात आले आहे. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता -</u>**

**७.** साक्षीदार क्र.१ राजेश सिताराम शेळके हा फिर्यादी असून त्याने त्याच्या साक्षीत सांगितले की, घटना दि.२०.०३.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता घडली. त्यावेळी तो घरी हजर होता. आरोपी क्र.१ याने रस्त्यावर पाणी सोडले होते. ते त्याला हटकले असता, आरोपी क्र.१ ने त्याला शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी क्र.२ व ३ आले व त्यांनीही त्याला शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र.२ व ३ यांनी त्याचे हात पकडले व आरोपी क्र.१ ने त्याचे कपडे फाडले व छातीला चावा घेतला. त्याने असे

कथन केले की, त्यावेळी तेथे भानुदास शेळके, दशरथ पुर्णाजी आमले व गोपाल लेळे हे आले व त्यांनी भांडण सोडविले. त्यांनी त्यांच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान असे कथन केले आहे की, सन २००८ साली त्यांचे व त्यांचे भावाविरुद्ध आरोपीच्या वडीलांनी जाणायेण्याचा रस्ता बंद केला म्हणून दिवाणी केस दाखल केली होती. तसेच सन २००८ पासून त्याची व आरोपींची बोलचाल बंद आहे.

८. साक्षीदार क्र.२ दशरथ पुर्णाजी आमले याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, हिवरखेड पोलिसांनी त्याला २१.०३.२०१७ रोजी पंचनाम्यासाठी बोलविले होते, त्याच्यासमक्ष पंचनामा तयार करण्यात आला. त्याने घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.३८ वर शाबीत केला. त्यांनी त्यांच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान असे कथन केले आहे की, फिर्यादी व त्याचे भावासोबत त्याचे चांगले संबंध आहेत.

९. प्रत्यक्षदर्शी सा.क्र.३ भानुदास सुखदेव शेळके याने त्याच्या साक्षीत असे कथन केले की, त्यांना घटनेबाबत काहीच माहिती नाही. पोलिसांनी त्यांचे बयाण घेतले नव्हते. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने सरकारी अभियोक्ता यांनी विनंती करुन परवानगी घेवून उलट तपासणीच्या स्वरुपात काही प्रश्न विचारले असता अभियोग पक्षास उपयुक्त होईल असे काहीही अभिलेखावर आले नाही. करिता सदर साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षास उपयुक्त ठरणारी नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी सा.क्र.१ व्यतिरीक्त ईतर कोणताही साक्षीदार अभिगोय पक्षास समर्थन करीत नाही. तसेच फिर्यादीच्या उलटतपासातून असे दिसून येते की, सन २००८ साली त्यांचे व त्यांचे भावाविरुद्ध आरोपीच्या वडीलांनी जाणायेण्याचा रस्ता बंद केला म्हणून, दिवाणी केस दाखल केली होती. तसेच आरोपी व त्यांचे सन २००८ पासून पटत नाही व त्यांची बोलचाल बंद आहे. म्हणुन त्याचा पुरावा संदिग्ध

स्वरुपाचा असून त्यामुळे त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही. तसेच फिर्यादीचे पुराव्यात असे आले आहे की, घटनेच्या वेळी भानुदास शेळके, दशरथ पुर्णाजी आमले व गोपाल लेळे हे आले व त्यांनी भांडण सोडविले. परंतु सदर घटनेचे महत्वपुर्ण प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ भानुदास सुखदेव शेळके यांनी अभियोग पक्षाला समर्थन दिले नाही. तसेच सा.क्र.२ दशरथ आमले यांनी सुद्धा घटनेबाबत कोणतेही कथन केले नाही. सदर खटल्यामध्ये कोणतेही स्वतंत्र साक्षीदारांनी आरोपीं विरुध्द पुरावा दिलेला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने तपासी अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना वारंवार संधी देवूनही तपासले नाही.

**११.** अशा परिस्थीतीत आरोपीविरूध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे सबळ पुराव्या अभावी सिध्द करण्यास अभियोगपक्षास अपयश आले आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करिता :–**

**१२.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थतीचा बारकाईने विचार करता, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी मारपीट करुन दुखापत पोहचविली. तसेच आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन जिवानीशी मारण्याची धमकी दिली इत्यादी बाबी अभियोगपक्ष सिध्द करण्यास पुर्णत: अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचीत वाटते. परिणामत:, मी मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ ते ३ यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ च्या शिक्षापात्र गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अपिल दाखल झाल्यास अपिल न्यायालयासमोर हजर राहील याकरीता आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यत प्रत्येकी रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.07.08 17:14:34 +0530

**( एन. व्ही. साहु )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
तेल्हारा.

दिनांकः ०८.०७.२०२६.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Telhara. |
| Date of Order /Judgment | 08.07.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. On | 08.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | 08.07.2026 |